

# पुणे विद्यापीठ
सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ
**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१३–१४/५९० दिनांक : १९/१२/२०१३.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय** :– स्त्री पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी 'जागर जाणीवांचा' अभियानाबाबत.....
संदर्भ क्र. :– शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाचे पत्र क्र. ससं/उशि/ जागर जाणिव/२०१३–१४/पीआर/२९८७, दि. १८ डिसेंबर, २०१३ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्री–पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी जागर जाणीवांचा अभियांनातंर्गत पाठविण्याचे प्रस्ताव **शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे – ०१ यांचे कार्यालयास दि. २३ डिसेंबर, २०१३ पर्यंत** पाठविण्यात यावेत. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबतचे शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे विभग, पुणे – ०१ कार्यालयाचे पत्र आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडले आहे. याबाबतची माहिती घेऊन आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत याबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे,

19/12/13

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे विद्यापीठ पुणे-४११००७

सोबत : वरीलप्रमाणे.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
### १७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-१.

फोन न. ०२० २६१२७८३३/२६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com फॅक्स नं. २६०५१६३२

जा.क्र. ससं/उशि/जागर जाणिव//२०१३-१४/पीआर /2987

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित**

दि. १७.१२.२०१३

**स्मरणपत्र-१**

18 DEC 2013

प्रति,

कुलसचिव,
पुण विदयापीठ, पुणे-७.

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 4176
दिनांक - 19/12/13
जावक दिनांक- 19/12/13
विभाग -
D/S.W. D/N.S.S.

विषय - राज्यातील महाविदयालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी जागर जाणीवांचा अभियांनातंर्गत पारितोषिक अंमलबजावणी करणेबाबत.... परितोषिक निवड कार्यपध्दती (SOP) स्टॅडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर.

संदर्भ - १. मा. शिक्षण संचालक (उ.शि.) म.रा. पुणे यांचेकडील जा.क्र. युएनआय/संकिर्ण/विशि-१/८७५७ दि. ३० नोहेंबर २०१३ चे पत्र.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण/२०१२/प्र.क्र.२९६/१२/विशि-१ दि. २३ ऑक्टोबर २०१३ चे पत्र.
३. या कार्यालयाकडील जा.क्र. सम दि. ५ डिसेंबर २०१३ चे पत्र

वरील विषया संबंधीच्या संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विदयापीठांच्या कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय, अशासकीय **अनुदानित, अशासकीय विनाअनुदानित, अशासकीय कायम विनाअनुदानित व इतर सर्व महाविदयालयांच्या** सदरचा (SOP) निदर्शनास आणून देण्याबाबत आपणांस संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते तरी उपरोक्त दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणेबाबत सर्व महाविदयालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात आलेले असेलच तरी संबंधीत महाविदयालयांना आपल्या स्तरावरुन पुन्हा स्मरणपत्र पाठविण्यात यावे. याबाबत आपण केलेली कार्यवाही या कार्यालयासही न चुकता कळवावी.

जागर जाणिवांचा या अभियानाच्या माध्यमातून महाविदयालयातील सर्व विदयार्थी-विदयार्थीनी शिक्षक अणि महाविदयालयांचे प्रशासन इत्यादींना त्यांचे महत्व पटवून त्यांनी सक्रिय व सातत्यपूर्ण सहभाग घेवुन सदरचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिपत्रक व शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरुन महाविदयालयांना सूचित करण्यात यावे. याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव हार्ड कॉपीसह या कार्यालयात **दि. २३ डिसेंबर २०१३ पर्यत** पाठविण्याबाबतच्या महाविदयालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. **तसेच कालमर्यादा कटाक्षाने पाळावी कालमर्यादेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत व विलंबाची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांची रहाणार आहे याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.**

(डॉ.एस.एस.शेंटे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभाग, पुणे-१